Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL
Vol II

12 January 2019
SPECIAL ISSUE – 92

# भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeवला, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Prof. Gangane R.V.**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. M.S. Kamble**
Assit. Prof. Dept. of History,
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net
© All rights reserved with the authors & publisher
Price : Rs. 400/-



Scanned with CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | 12 January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue 92 , भारतीय इतिहासातील स्त्रियांचे योगदान

# 19 व्या शतकाच्या स्त्री शिक्षणातील पंडिता रमाबाई यांची भूमिका व कार्य

**प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र**
सहाय्यक प्राध्यापक, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा- अहमदनगर

---

**प्रास्ताविक :-**

कालखंडापासून भारतीय इतिहासामध्ये स्त्रिया सक्रिय असल्यातरी म्हणावी तेवढी त्यांची ओळख समजापुढे प्रकर्षाने आलेली दिसत नाही. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रीयांना कायमच दुय्यम लेखले गेले. भारतीय परंपरेने तिला पतिव्रता, माता, भगिनी, आणि पत्नी या भूमिकेबद्दल गौरविले, पण प्रत्यक्षात मात्र ती विषमतेची बळी ठरली. बालिकाहत्या, बालविवाह, बहुभार्या पद्धत, सती, केशवपन, विधवा विवाहाला बंदी व तिला शिक्षणापासूनही वंचित ठेवण्यात आले. रजिया सुलतान, चांदबीबी, जिजाबाई, ताराबाई, आहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, आशा कर्तृत्ववान स्त्रिया अपवादात्मक असल्यातरी सामाजिक वैगुण्यामुळे तिची स्थिती दयनीय बनली होती. एकीकडे यत्र नार्यस्तु पुजन्ते तर दुसरीकडे न स्त्री स्वतंत्र महर्ती एकदंरीत अशी स्त्रियांची दुर्दशा होती. 19 व्या शतकातील स्त्रीला चालीरिती परंपरेनुसार दिला गेलेला दर्जा हा पाश्चिमात्य महिलांच्या तुलनेने निम्न व अमानवीय जीवन जगण्यास भाग पाडणारा होता. असे असले तरी 19 व्या शतकातील सामाजिक, धार्मिक व पुनरूज्जीवनवादी आंदोलने स्त्री हक्क व त्यांच्या प्रश्नाभोवती केंद्रीत झालेले दिसते.[1]

परकियांच्या प्रवेशाने मध्ययुगीन वैचारिक संकल्पना यांचा पाडाव होवून आधुनिक विचारांना चालना मिळाली. 19 वे शतक हा एक महत्वाचा टप्पा होता. या शतकात सामाजिक, धार्मिक, राष्ट्रवाद व स्वातंत्र्य आंदोलनाची सुरुवात झाली. याच शतकात आधुनिक कालखंडाचा प्रारंभ झालेला दिसतो. हे उल्लेखनीय आहे. शतकाच्यां प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य होते. नवीन शासन पद्धती, इंग्रजी शिक्षण, वृत्तपत्रांची वाढ, नवे सामाजिक, आर्थिक व राजकीय विचार, विविध संस्थांचा उदय, ख्रिस्ती धर्मप्रसार, उदरमतवादाचा प्रभाव ही प्रथमार्धाची प्रमुख वैशिष्टये होय.[2] यामुळे याच दरम्यान स्त्रियांच्या समस्यांची जाणीव होवून त्यांची अभिव्यक्ती व चर्चा सुरू झालेली दिसते. उत्तरार्धात हे प्रश्न सोडविण्यासाठी सामाजिक चळवळ सुरू झाली. अर्थात 19 व्या शतकातील प्रबोधनामुळे स्त्रीयांविषयीचा दृष्टीकोन बदलू लागला. सुधारकरांना काही वेळा सरकारचे सहाय्य मिळत होते. भारतातील सर्व सुधारणावादी व पुनरुज्जीवनवादी चळवळी या प्रामुख्याने स्त्री प्रश्नाभोवतीच गुंतल्या होत्या. शिक्षणामुळे निर्माण झालेल्या जागृतीमुळे 19 व्या शतकात काही शिक्षित महिला पुढे आल्या. त्यांनी अनुभवांना, विचारांना शब्दाचे व कृतीचे रूप देण्याच्या प्रयत्न केला. यात पंडिता रमाबाई यांची भूमिका ही महत्वाची आहे. म्हणून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणे क्रमप्राप्त ठरते.[3]

पश्चिम महाराष्ट्रातील गंगामलच्या जंगलात जन्म झालेल्या (23 एप्रिल 1858) पंडिता रमाबाई यांच्या शिक्षणाची सुरूवात त्यांच्या आईनेच करून दिली. वयाच्या आठव्या वर्षापासून ते वयाच्या 15 व्या वर्षापर्यंत त्यांच्या आईनेच त्यांना शिक्षण दिले. अशा तऱ्हेने शिक्षणाला सुरुवात झाल्याने त्या आपल्या वडिला सोबत संपूर्ण भारतभर फिरल्या. दरम्यानच्या काखखंडात त्यांनी शास्त्रे, पुराणे, महाकाव्ये इत्यादी मध्ये त्या पारंगत झाल्या. आई वडिलांचे छत्र हरपलेल्या रमाबाई यांनी व्याख्याती म्हणून प्रसिद्धी मिळविली व त्यामाध्यमातून त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. कलकत्यातील पंडितांनी त्यांना व्याख्यानासाठी आमंत्रित करून त्यांचे विचार ऐकण्यासाठी त्यांना कलकत्ता येथे बोलावून 'बुद्धीची देवता' अर्थात 'पंडिता' ही पदवी प्रदान केली हे अर्थपूर्ण होते.[4] पतीच्या मृत्यूनंतर (12 मे 1882) पुणे येथे आल्या. याचवर्षी भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये काही परिवर्तन घडवून आणण्यासाठी नेमलेल्या मंडळात त्यांची वर्णी लावली गेली. शिक्षकांना प्रशिक्षण व शाळामधील स्त्री परिक्षकांची नेमणूक करणे तसेच स्त्रीयांच्या वैद्यकीय उपचाराकरिता स्त्रीयांना वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यासाठी त्यांनी शासनाकडे धरलेला आग्रह हा स्त्री कल्याणाच्या दृष्टीने महत्वाचा होता. इंग्लंड या ठिकाणी (1883) शिक्षक प्रशिक्षण घेणाऱ्या पंडिता रमाबाईने चर्चाच्या निमंत्रणावरून अमेरिकेत (1886) जाऊन बालविधवाच्या शाळेला निधी पुरविणाऱ्या मंडळाची स्थापना केली. हे उल्लेखनीय असेच आहे. न्या. रानडे व डॉ. भांडारकर सारख्या प्रार्थना समाज सुधारकरांनी आर्य महिला सारख्या संस्थेच्या माध्यमातून रमाबाई यांना एक व्यासपीठ निर्माण करून दिले. स्त्री शिक्षण व स्त्री स्वावलंबनाचा पाया त्यांनी आर्य महिला समाजाच्या माध्यमातून घातलेला दिसतो. समाजातील विधवाचा जटील प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी ठिकठिकाणी विधवा आश्रम उभारण्याची आखलेली योजना खऱ्या अर्थाने विधवा स्त्रियांना आधार देणारी ठरली.[5]

पंडिता रमाबाई यांनी (एप्रिल 1889) मुंबई या ठिकाणी 'शारदा सदन' ची स्थापना विशेषतः विधवासाठी शाळा, वसतिगृहे सुरू केली. विधवासाठी स्थापन केलेली ही पहिलेच वसतिगृह होते. विधवांना शिवणकाम, स्वयंपाक, भरतकाम, शिक्षण आदी प्रशिक्षण वर्ग उपलब्ध करून दिले. व त्यांना शिक्षणा सोबत स्वावलंबनाचा मार्ग दिला. ख्रिश्चन धर्म स्विकारलेल्या रमाबाई यांच्या संस्थेकडे संशयाने पाहिले गेले. तसेच सदनातील सातपैकी दोन विधवांच्या ख्रिश्चन धर्माबद्दल वाटणारे प्रेम ख्रिस्ती साप्ताहीकाने (डिसेंबर 1889) अहवालात मांडला. त्यामुळे पुनरुज्जीवनवादी वातावरणात या अहवालाने वादळ उठल्याने भांडारकर व न्या. रानडे यांनी सदनापासून फारकत घेतली. पंडिता रमाबाईनी धर्मप्रकार करणे थांबवावे म्हणून अनेक निवेदने दिली गेली. पण त्यांचा उपयोग झाला नाही. पुढे शारदा सदन पुणे येथे स्थलांतरीत केले. सुरुवातीस 300 मुलींची सोय झालेल्या या सदनातील संख्या हजारावर गेली. पुणे येथील मुक्तीसदनच्या माध्यमातून त्यांनी विविध उदयोग चालू केले. त्यात नर्सिंग छापखाना, साडया विणने, ऊस व दुग्धजन्य पदार्थ यांचे उत्पादन सुरू केले. 'मुक्तीफेअर बेल' त्रैमासिक व द

इस्टीमनी हा आत्मचरित्रात्मक ग्रंथ लिहीला. त्याच्या कार्याबद्दल ब्रिटीशांनी त्यांना 'कैसरहिंद सुवर्णपदक' देवून गौरविले. मुक्तीसदनाची संख्या …ंशांसे पर्यंत पोहचली.

बालविधवांचे समस्या सोडविणे व स्त्री दास्य विमोचन, समाज सुधारणा करणे या उदिष्टांसाठी त्या सतत झटत राहिल्या. शारदा व मुक्तीसदनांच्या कार्यातून स्त्री शिक्षण व स्त्रीस्वावलंबनाबाबतचा घेतलेला दृष्टिकोन भारतीय स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न वाढविणारा ठरला. या संस्थात्मक कार्यातून स्त्रियांनी स्त्रियांच्या विकासासाठी कार्य करण्याची नवी दिशा नवा मार्ग पुढील पिढीतील स्त्रियांना दिला. पंडिता रमाबाई यांचे कार्य मैलाचा दगड म्हणून पुढील स्त्रीयांना पथदर्शक ठरला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) जी. एल. भिडे, एन. डी. पाटील, 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर पृ.क्र. 13.
2) डॉ. राजा दिक्षित व संपादक मंडळ (संपा) पुणे विद्यापीठ इतिहास परिषद शोध निबंध संग्रह खंड 1 20 फेब्रुवारी 2010 पृ. क्र. 58
3) डॉ. राधाकृष्ण जोशी व संपादक मंडळ (संपा) 'शोधांकन', भाग 5, जाने. 2006 पृ.क्र. 15
4) डॉ. पद्मजा पाटील, डॉ. शोभना जाधव, 'भारतीय इतिहासातील स्त्रीया', फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती मार्च 2007 पृ.क्र. 288
5) बा.ग. जगताप, 'भारतीय शिक्षणाचा इतिहास' मॅकमिकान आणि कंपनी लि. बॉम्बे 1948 पृ.क्र. 147.

Scanned with CamScanner